कुलसचिव, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ,
अकोला

लोकमत 26/02/2025

# नगर परिषद, बाळापुर

## जाहीर प्रसिद्धीकरण

राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समायोजित लोकसेवा देण्याकरीता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेवून त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश 2015 दिनांक 28/04/2015 रोजी लागू करण्यात आला आहे. सदर अध्यादेश निर्गमित करण्यामागे सार्वजनिक प्राधिकरणाने पूर्वी असलेल्या सेवा अधिनियमांतर्गत अधिसूचित करून त्याप्रमाणे संबंधित सेवा पुरविणे आवश्यक आहे. त्यामध्ये नगर परिषद या नागरी स्थानिक संस्थांचा समावेश आहे. नागरी संस्थांमार्फ देण्यात येणाऱ्या विविध सेवा सुविधांपैकी नागरिक केंद्रबिंदू मानून, नागरिकांना दैनंदिन जीवनामध्ये सातत्याने आवश्यक असणाऱ्या व ज्या लोकसेवांचा जास्तीत जास्त फायदा घेतलेला आहे व ज्या सेवा महत्त्वाच्या आहेत, अशा सेवा अध्यादेशाच्या कलम 3 (अ) नुसार अधिसूचित करण्याबाबत महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एमसीओ-2015/प्र.क्र. 189/ नवि 14, दिनांक 23/06/2015 नुसार मा. शासनाने निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्र शासनाने शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार एकुण ७४ सेवांपैकी ६६ लोकसेवा स्थानिक प्राधिकरणांनी अध्यादेशाचे कलम 3 (अ) नुसार अधिसूचित केल्या आहेत. त्यानुसार महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, 2015 कलम 3 (अ) अन्वये नगर परिषद कार्यालय, बाळापुर कडून नागरिकांकरिता उपलब्ध करून येत असलेल्या एकूण ६६ लोकसेवांची सूची, आवश्यक कागदपत्र, सेवा शुल्क (फी), नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकरी, प्रथम अपिलिय अधिकारी व व्दितीय अपिलिय अधिकारी यांना पदनिर्देशित करण्यात आले आहे. तसेच नगर विकास विभागाने विविध शासन निर्णयाद्वारे विहित केलेल्या सेवांची यादी https://mahaulb.in/MahaULB/index या वेब पोर्टल वर व बाळापुर नगर परिषद कार्यालयाच्या नोटीस बोर्ड वर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

| | |
|---|---|
| स्वा/- | स्वा/- |
| (अनिरुध्द बक्षी) | (सतीश गावंडे) |
| प्रशासक | मुख्याधिकारी |
| नगर परिषद बाळापुर | नगर परिषद बाळापुर |

Scanned with OKEN Scanner